ARTHA Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २४ | पुणें, बुधवार तारीख ३० एप्रिल, १९५८ | अंक १८

## विविध माहिती

**भारतीय डॉक्टरचा विजय**—ब्रिटनमधील बॅटरसी लोकल कौन्सिलच्या एका जागेवर डॉ. गुलाटी हे पंजाबी डॉक्टर निवडून आले आहेत. त्यांनीं आपल्या हुजूरपक्षीय प्रतिस्पर्ध्याचा २,००० मतांनीं पराभव केला. डॉ. गुलाटी मजूर पक्षाचे सभासद आहेत. वैद्यकीय अभ्यासासाठीं ब्रिटनला जाणाऱ्या हिंदी विद्यार्थ्यांना ते नेहमी मदत करीत असतात.

**राष्ट्रीय शिस्त योजना**—येत्या शैक्षणिक वर्षापासून पंजाब, मुंबई व आंध्र राज्यांतील शाळेंत जाणाऱ्या एक लाख मुलांना राष्ट्रीय शिस्त योजनेच्या कक्षेंत समाविष्ट करण्यांत येईल. ह्या योजनेसाठीं केंद्र सरकारनें १९ लाख रुपये मंजूर केले असून मुंबई राज्य सरकारनें ५ लाख रुपये मंजूर केले आहेत.

**बंगाली कवीचा सन्मान**—श्री. प्रेमेंद्रकुमार मित्र ह्या बंगाली कवीच्या काव्यसंग्रहाला, त्या भाषेंतील उत्कृष्ट पुस्तक म्हणून, राष्ट्राध्यक्षांनीं आपलें पदक दिलें होतें. आतां पश्चिम बंगाल सरकारनेंहि त्याच पुस्तकास रवींद्रनाथ-स्मृति बक्षीस देण्याचें ठरविलें आहे. बक्षीस ५,००० रुपयांचें आहे.

**प्रामाणिक कामगार** - अहमदाबादमधील एका गिरणींतील कामगाराला तिसरी पाळी बंद करण्यांत आल्यामुळें कामावरून कमी करण्यांत आलें व त्याला प्रॉव्हिडंट फंडाचे १,४०० रुपये देण्यांत आले. पण, आपल्या फंडांत एवढी रक्कम जमा नसल्यानें त्यानें रु. ६७५ ही खरी रक्कम ठेवून घेतली व बाकीची परत केली.

**भूमिहीनांना जमीन**—इंदूर भागांतील भूमिहीन शेतकऱ्यांना वाटण्यासाठीं ४ लाख एकर जमीन मिळूं शकेल, अशी माहिती इंदूरच्या कमिशनरनीं दिली आहे. ह्या जमिनीचें वांटप लवकरच सुरू होणार आहे. त्याशिवाय आणखी ६,००० एकर जमीन मागासलेल्या जमातींना वाटून देण्यांत येणार आहे.

**श्रीमंत नीग्रोची खरेदी**—न्यूयॉर्क येथें भरलेल्या आंतरराष्ट्रीय मोटारींच्या प्रदर्शनांत २५,००० डॉलर्स किंमतीची एक मोटार होती. ही मोटार एका निग्रो उद्योगपतीनें विकत घेतली. मोटारींत सात माणसें बसण्याची सोय आहे, व तींत सर्व प्रकारच्या आधुनिक सुखसोयी करण्यांत आलेल्या आहेत.

**खेळाच्या सामानाचा धंदा**—खेळाचें सामान तयार करण्यासाठीं दिल्ली येथें एक लहान इंडस्ट्रिअल एस्टेट स्थापन करण्यांत येणार आहे. फाळणीनंतर हा धंदा बराच विस्कळित झाला होता. ह्यासंबंधीची योजना तयार करण्यांत आली असून तिची अंमलबजावणी तीन वर्षांच्या काळांत होईल.

**पाकिस्तानी शास्त्रज्ञांना शिक्षण**—पिंपरी येथील पेनिसिलिनच्या कारखान्यांत शिक्षण घेण्यासाठीं पाकिस्तानमधून चार शास्त्रज्ञ आले आहेत. पश्चिम पाकिस्तानांत काढण्यांत यावयाच्या पेनिसिलीनच्या कारखान्याची व्यवस्था पहाता येण्याच्या दृष्टीनें त्यांना शिक्षण देण्यांत येणार आहे.

**मुंबईची भुयारी रेल्वे**—मुंबईच्या बेस्ट वाहतुक कंपनीनें म्युझिअमपासून दादरपर्यंत जाणाऱ्या भुयारी रेल्वेची योजना तयार केली आहे. ह्या योजनेसाठीं अंदाजें २६.५५ कोटी रुपये खर्च येईल. हा मार्ग शीव—माहीमपर्यंत वाढविण्यांत आल्यास आणखी १४.८५ कोटी रुपये खर्च करावा लागेल.

**बिनतिकिटाचे प्रवासी**—तिकिट न काढतां प्रवास करणारे प्रवासी व योग्य कारणाशिवाय साखळी ओढून गाडीचा खोळंबा करणारे लोक, ह्यांच्याविरुद्ध अधिक परिणामकारक उपाय करतां यावे म्हणून कायदेशीर योजना कडक करण्यांत येणार आहे. ह्यासंबंधींचें बिल लोकसभेंत लवकरच मांडण्यांत येणार आहे.

**रूरकेला येथील पोलाद-कारखाना**—रूरकेला येथें काढण्यांत येणाऱ्या पोलादाच्या कारखान्यांतील पहिली भट्टी चालू वर्षअखेर सुरू होईल, अशी माहिती कारखान्याच्या संचालक-मंडळाचे अध्यक्ष, श्री. भूतलिंगम्, ह्यांनीं सांगितली आहे. ह्या भट्टींत बिढाचें लोखंड तयार करण्यांत येईल.

**पूर्व जर्मनी-रशिआ व्यापारी करार**—सोव्हिएट रशिआ व पूर्व जर्मनी ह्यांच्या दरम्यान एक व्यापारी करार नुकताच करण्यांत आला. ह्या कराराप्रमाणें उभयतां देशांनीं आपआपल्या देवाण-घेवाणींत १० टक्क्यांची वाढ करावयाची आहे. पूर्व-जर्मनीकडून रशिआ औद्योगिक माल घेणार आहे.

दातांच्या स्वच्छतेसाठी
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

## किर्लोस्कर ऑइल इंजिनांची निर्गत

किर्लोस्कर ऑइल एंजिन्स लि. चा कारखाना चोवीस तास चालू आहे आणि इंजिनांचें उत्पादन एकसारखें वाढत आहे. तथापि, हें उत्पादन मागणी पुरी पाढण्यास अपुरें पडत आहे. भारतांतील ऑइल इंजिनांच्या उत्पादनांत किर्लोस्कर कारखाना अग्रेसर आहे आणि निर्गतीचे बाबतींत तर त्याचा भाग जवळ जवळ शंभर टक्के आहे. अशा कारखान्यानें निर्गत वाढवून परदेशी बाजारपेठांत प्रतिष्ठेचें स्थान मिळविण्यास हा समय अत्यंत सोईचा आहे. भारताला आवश्यक अशी परदेशीय हुंडणावळ त्यामुळें मिळण्यास मदत होते, आणि निर्गत व्यापारांत वाढ होत गेली म्हणजे ही प्राप्तीहि पुढें वाढत जाणारी आहे. किर्लोस्करांच्या कारखान्यांच्या वाढीसाठी कांहीं यंत्रसामुग्री परदेशांतून आणावी लागते. त्यासाठी परदेशी हुंडणावळ खर्ची पडते. स्वतःचीं इंजिनें परदेशांत खपवून, परदेशी हुंडणावळ स्वावलंबनानें मिळविल्यानें, म्हणजे बाहेर पाठविलेल्या रकमेपेक्षा जास्त रकम भारतांत स्वतः आणल्यानें, किर्लोस्करांच्या कारखान्यांची उभारणी पूर्णपणें स्वदेशीच होणार आहे; त्यामुळें दुसऱ्या कोणत्याहि आयातीस काट बसणार नाहीं आणि परदेशी हुंडणावळीचा झरा कायम टिकून पुढें भारताला प्रत्यक्ष वाढावा सतत मिळूं लागणार आहे. इंजिनांच्या सारखा इंजिनिअरिंगचा माल परदेशांत आपल्या गुणावर, औद्योगिक पाश्चात्य देशांच्या स्पर्धेस तोंड देऊन, खपविण्याइतकी किर्लोस्कर ऑइल एंजिन्स लि. नें अल्पावधींत प्रगति केली आहे, हें त्याच्या चालकांस भूषणावह आहे. आपल्या देशांतील ग्राहकांना दरसाल अधिकाधिक इंजिनें पुरवूनच आणि त्यांची गैरसोय टाळण्याची शिकस्त करूनच, किर्लोस्करांनीं निर्गतीस प्रारंभ केला आहे; आणि कारखान्याची उत्पादनक्षमता वाढवून इंजिनांचा पुरवठा भरपूर करण्याच्या प्रयत्नांत चालक सध्यां गुंतले आहेत. किर्लोस्करांच्या निर्गत-धोरणाची ही पार्श्वभूमि कारखान्याचे प्रमुख, श्री. शंतनुराव किर्लोस्कर, ह्यांनीं एका पत्रकार परिषदेंत नुकतीच समजावून सांगितली, ती सर्वांच्या लक्षांत येणें जरूरीचें आहे.

---

### लॉर्ड रे महाराष्ट्र औद्योगिक संग्रहालय, पुणें २.

## वासंतिक शास्त्रीय व्याख्यानमाला

(१ मे, १९५८ ते ३१ मे, १९५८)

संग्रहालय शिक्षणविभागाच्या विद्यमानें दि. १ मे, १९५८ ते ३१ मे, १९५८ अखेर वासंतिक शास्त्रीय व्याख्यानमाला चालविण्यांत येणार आहे. या मालेंतील व्याख्यानें बुधवार खेरीज दररोज सकाळीं ९ ते १० या वेळांत होतील.

व्याख्यानें शास्त्रीय व औद्योगिक विषयांवर होणार असून शक्य त्यावेळीं प्रात्यक्षिकें, चित्रपट, स्लाईडस्, इत्यादि दाखविण्यांत येणार आहेत.

व्याख्यानमालेस प्रवेश विनामूल्य आहे. तथापि, संग्रहालय सभागृहांतील जागेची अडचण लक्षांत घेऊन प्रवेश मर्यादित ठेवण्यांत येणार आहे.

व्याख्यानमालेंत होणाऱ्या व्याख्यानांच्या विषयांची यादी ग्रंथालयांत पाहावयास मिळेल.

पुणें, १७-४-१९५८

वि. गो. काळे.
व्यवस्थापक
वासंतिक शास्त्रीय व्याख्यानमाला.

**परदेशीय प्रवाशांत वाढ**—ह्या वर्षी काश्मीरमध्यें येणाऱ्या परदेशीय प्रवाशांच्या संख्येंत ९० टक्के वाढ झाली आहे. गेल्या वर्षी मार्च महिन्याच्या अखेरीपर्यंत काश्मीरमध्यें २२२ परदेशीय प्रवासी आले होते. चालू वर्षी प्रवाशांची संख्या ४०२ पर्यंत चढली.

**निर्वासितांकरितां सुताची गिरणी**—डेहराडून जवळील प्रेमनगर ह्या निर्वासितांसाठी वसविण्यांत आलेल्या गांवीं एक सुताची गिरणी काढण्याचें उत्तरप्रदेश सरकारनें ठरविलें आहे. ह्या गिरणींत सूत कातण्याच्या २,५०० चात्या बसविण्यांत येतील. गिरणीमुळें बऱ्याच निर्वासितांना रोजगार मिळूं शकेल.

**जर्मन सरकारची मदत**—भारताच्या दक्षिण भागासाठी मद्रास राज्यांत गिंडी ह्या ठिकाणीं उच्च तांत्रिक शिक्षण देणारी संस्था स्थापन करण्यांत येणार आहे. ह्या संस्थेला तांत्रिक मदत करण्याचें पश्चिम जर्मन सरकारनें मान्य केलें आहे. पश्चिम जर्मन सरकारकडून ह्या कामीं १·७ कोटी रुपयांची मदत करण्यांत येणार आहे.

**बडोद्यांत तेलाचा शोध**—बडोद्यांतील लक्ष्मी विलास राजवाड्याजवळ खनिज तेलासाठी खोदाई करण्यास प्रारंभ झाला आहे. ह्या कामीं रशिअन तंत्रज्ञांचें साह्य घेण्यांत येत आहे. आतांपर्यंत ७०० फूट खोल खोदण्यांत आलें आहे. भारत सरकारच्या नैसर्गिक वायु व खनिज संशोधन खात्यामार्फत हा प्रयत्न चालू आहे.

**मोटार कामगारांत कपात**—अमेरिकेंतील आर्थिक मंदीमुळें निरनिराळ्या कारखान्यांतून कामगारांना अजूनहि कमी करण्यांत येत आहे. अमेरिकेमधील मोटारींचे कारखाने लवकरच ३०,००० कामगारांना रजा देण्याचा विचार करीत आहेत. कारखान्यांतून ८,५०,००० मोटारी पडून असल्यामुळें हा निर्णय घेण्यांत येणार आहे.

**अमेरिकेचा कृत्रिम उपग्रह**—गेल्या महिन्यांत अमेरिकेनें अंतरिक्षांत सोडलेला 'व्हॅनगार्ड' नांवाचा छोटा उपग्रह निदान २०० वर्षें तरी पृथ्वीभोंवतीं फिरत राहील, असा अंदाज करण्यांत आला आहे. हा उपग्रह पृथ्वीभोवतीं दर दोन तास व अकरा मिनिटांनीं एक प्रदक्षिणा पुरी करीत आहे.

**उत्कृष्ट रेल्वेस्टेशन**—पूर्व रेल्वेवरील हौरा रेल्वे स्टेशनला त्या रेल्वेवरील सर्वांत अधिक टापटीपीनें ठेवलें गेलेलें रेल्वे स्टेशन म्हणून बक्षिस मिळालें आहे. स्वच्छतेसाठी २५० झाडूवाले आणि शिवाय ५० आरोग्यविषयक इन्स्पेक्टर्स खपत होते.

५० वर्षांपेक्षा जास्त जनतेची सेवा करीत असलेलें मुंबईतील एक प्रसिद्ध निवासस्थान

**सरदारगृह**

प्रत्येक खोलींत स्वतंत्र बाथरूम व बाल्कनी
लग्नमुंजी वगैरे कार्यांची व भोजनपार्टींची कमी खर्चांत मनपसंत व्यवस्था
समासंमेलनें यांची टिळक हॉलमध्यें सोय.
क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.

# अर्थ

बुधवार, ता. ३० एप्रिल, १९५८





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## अणुशक्तीवरील विजेची यंत्रसामुग्री

भारतानें अणुशक्तीचा उपयोग करून वीज निर्माण करण्याची योजना तयार केली आहे. ह्या वीज निर्मिति केंद्रासाठी लागणारी अद्यावत् पद्धतीची यंत्रसामुग्री बहुधा ब्रिटनकडून घेण्यांत येईल. अणुशक्तीचा वापर व्यापारी दृष्ट्या किफायतशीर करण्याच्या दृष्टीनें ब्रिटननें बरीच प्रगति केली आहे, असें म्हणतात. त्यामुळें अणुशक्तीनिर्मित विजेचा सर्वच कारखाना ब्रिटनकडून घेणें भारताच्या हिताचें ठरणार आहे, असें तज्ज्ञांचें मत आहे. अमेरिकेकडूनहि असा कारखाना मिळूं शकेल. परंतु अमेरिकन पद्धतीच्या कारखान्याला कांहीं विशिष्ट प्रकारचें युरेनिअमचें जळण लागतें. भारताला अणुशक्तीच्या साह्यानें जितकी वीज निर्माण करावयाची आहे तिच्यासाठी लागणारें हें जळण परदेशीय हुंडणावळ देऊन विकत घ्यावें लागेल. म्हणजे, ह्या जळणासाठी भारताला नेहमींच परदेशीय हुंडणावळ द्यावी लागेल. त्यामुळें अमेरिकन पद्धतीचा कारखाना उभारण्यांत येण्याची फारशी शक्यता नाहीं. ब्रिटनमध्यें काल्डर हॉल येथें ज्या पद्धतीचें अणुवीज निर्मिति–केंद्र स्थापन करण्यांत आलें आहे, त्या पद्धतींत भारतामधील युरेनिअमच्या साठ्याचा जळण म्हणून उपयोग करतां येईल. ह्या प्रकारचा सुमारें ३०,००० टन जळणाचा सांठा भारताजवळ आहे. सध्या असें दिसत आहे कीं, १९५८ मध्यें नैसर्गिक युरेनिअमचा जळण म्हणून उपयोग करणाऱ्या अणुभट्टीची स्थापना करण्याच्या कामास प्रारंभ होईल. १९६२ मध्यें हें काम पूर्ण होईल. १९६५ च्या सुमारास अणुभट्टींतून प्ल्युटोनिअम मिळूं लागेल, आणि त्यानंतर थोरिअमचा उपयोग करून अणुभट्टीच्या साह्यानें वीज निर्माण करण्यास प्रारंभ होईल.

## चित्रपटांची लांबी कमी करण्याचा सल्ला

भारताच्या माहिती व नभोवाणी खात्याचे मंत्री श्री. बी. व्ही. केसकर ह्यांनीं मुंबई येथें बोलतांना, चित्रपट–निर्मात्यांना असा सल्ला दिला आहे कीं, त्यांनीं बोलपटांची लांबी कमी करण्याचा प्रयत्न करावा. चित्रपटांसाठी अधिक प्रमाणांत कच्च्या फिल्मची आयात करावी अशी मागणी करण्यांत येत आहे. तिचा उल्लेख करून डॉ. केसकर म्हणाले, कीं चित्रपटनिर्मात्यांनीं आपली भूक कमी केली पाहिजे. देशाला परदेशीय हुंडणावळीची चणचण भासत आहे. अशा वेळीं चित्रपटनिर्मात्यांनीं एकत्र येऊन चित्रपटांच्या लांबीसंबंधीं आपसांत कांहीं समजूत काढली पाहिजे. अधिक लांब चित्रपट लोकप्रिय होतात अशी गैरसमजूत कांहीं ठिकाणीं प्रसृत झालेली दिसून येते. पण निर्मात्यांनीं एकत्र येऊन ह्या संबंधीं कांहीं निर्णय घेतल्यास लोकांना ते पटणार नाहींत असें नाहीं. सध्याची परदेशी चलनाची परिस्थिति अशी आहे कीं, उपलब्ध असलेल्या परदेशी चलनाचा उपयोग राष्ट्रीय गरजांच्या दृष्टीनेंच केला गेला पाहिजे. पुष्कळ राष्ट्रीय उद्योगधंद्यांना परदेशी चलनाची जरूरी आहे. त्यांच्या गरजा भागतांना कोणत्याच धंद्यांची अतिशय कुचंबणा होईल अशा रीतीनें चलनाची वांटणी होता कामा नये. दुसरें असें कीं, चलनाची अडचण ही बऱ्याच काळपर्यंत टिकणारी आहे. म्हणून चित्रपट निर्मात्यांनीं आपला धंदा नव्या पायावर संघटित करणें अगत्याचें आहे. त्याशिवाय दुसरा मार्गच नाहीं. लागेल तितकी कच्ची फिल्म मिळूं शकणार नाहीं, हें सत्य निर्मात्यांनीं डोळ्यांसमोर स्पष्टपणें ठेवलें पाहिजे. शिवाय, त्यांनीं समाजाचें मन अधिक चांगल्या तऱ्हेनें जाणून घेतलें पाहिजे.

## गांजाबंदी पुढें ढकलण्याची सूचना

ओरिसा सरकारनें मध्यवर्ती सरकारला अशी विनंति केली आहे कीं, राज्यांत गांजाला संपूर्ण बंदी करण्याची योजना १९६१च्या मार्च अखेरपर्यंत पुढें ढकलण्यांत यावी. ह्या बाबतींत राज्य सरकारला कांहीं अडचणींना तोंड द्यावें लागत आहे. अखिल भारतीय मादक पदार्थ–विषयक परिषदेनें ह्यासंबंधीं असा ठराव केलेला आहे कीं, ओरिसा राज्यांत ३१ मार्च, १९५९ पासून गांजाला पूर्णपणें बंदी करण्यांत यावी. फक्त शास्त्रीय व वैद्यकीय कारणांसाठीच काय तो गांजा वापरण्यास परवानगी असावी. ओरिसा सरकारनें फेब्रुआरी, १९५८ अखेर संपलेल्या सहा महिन्यांचा महसूल व अबकारी खात्याचा अहवाल प्रसिद्ध केला आहे. त्यांत असें म्हटलें आहे कीं, राज्यांत गांजा मोठ्या प्रमाणावर उत्पादन केला जात नाहीं. तरीसुद्धां लोकांची मागणी पुरविण्यासाठी गांजाची लागवड करण्यांत येते. गांजाची लागवड प्रयोग म्हणून ज्या भागांत केली जाते तेथील लोक ह्या लागवडीशीं परिचित असून त्याला पूर्णपणें बंदी केल्यास ते बेकायदेशीर रीत्या गांजाची लागवड करूं लागतील. शिवाय राज्याच्या कांहीं डोंगराळ भागांत जंगली गांजाचीं झाडें आहेत. ह्या भागांशीं दळणवळण ठेवणें अवघड असल्यानें जंगली गांजाचा नाश करून तेथून गांजाची बेकायदा आवक थांबविणें शक्य होणार नाहीं. उत्सव–समारंभासारख्या प्रसंगीं गांजा ओढण्याची लोकांना संवय आहे. त्यांना ही संवय एकदम सोडतां येणें शक्य होणार नाहीं.

## दशमान नाण्यांचा प्रसार

१ एप्रिल, १९५७ ते ३१ मार्च, १९५८ पर्यंत २५५·८६ लाख रु. मूल्याचीं दशमान नाणीं चालूं करण्यांत आलीं. १ एप्रिल, १९५७ ते २८ फेब्रुवारी, १९५८ पर्यंत २१० लाख रु. मूल्याचीं जुनीं नाणीं वापरांतून काढून घेण्यांत आलीं. यांत जानेवारी व फेब्रुवारी १९५८ मध्यें काढून घेण्यांत आलेल्या व मुंबई आणि हैदराबाद येथील टांकसाळींत पाठविण्यांत आलेल्या नाण्यांचा समावेश नाहीं. १९५७–५८ मध्यें एकूण १३८·९२ लाख रु. मूल्याचीं जुनीं नाणीं वितळविण्यांत आलीं. १९५८–५९ मध्यें सुमारें ३४४·०९ लाख रु. मूल्याचीं दशमान नाणीं काढण्यांत येतील, असा अंदाज आहे.

# BHOR STATE BANK

## Balance Sheet as

| 31-12-1956 | CAPITAL & LIABILITIES | Rs. nP. | Rs. nP. |
|---|---|---|---|
| Rs. As. Ps | **1. Capital:** | | |
| | *Authorised Capital* | | |
| 5,00,000—0—0 | 10,000 Shares of Rs. 50/- each. ... | | 5,00,000-00 |
| | *Issued and Subscribed Capital.* | | |
| 5,00,000—0—0 | 10,000 Shares of Rs. 50/- each. ... | | 5,00,000-00 |
| 2,50,000—0—0 | Amount called up and Paid up at Rs. 25/-per share.... | | 2,50,000-00 |
| | **2. Reserve Fund & Other Reserves :** | | 81,164-87 |
| 46,600—0—0 | Reserve Fund. ... | 47,500-00 | |
| Nil | Investment Reserve Fund. ... | Nil | |
| 3,534—8—0 | Investment Fluctuation Fund ... | 3,534-50 | |
| 27,130—6—0 | Reserve for Bad and Doubtful Debts ... | 30,130-37 | |
| 77,264-14—0 | **3. Deposits and Other Accounts :** | | 13,46,933-52 |
| 4,91,333—5—6 | Fixed Deposits ... | 4,54,150-00 | |
| 5,90,558-11—6 | Savings Bank Deposits ... | 6,02,623-25 | |
| 2,94,810-14—5 | Current Accounts, Contingency Accounts, Etc. ... | 2,90,160-27 | |
| 13,76,702-15—5 | **4. Borrowings from Other Banking Companies, Agents, etc.** | | 49,655-82 |
| 14,510—9-10 | (i) In India. ... | 49,655-82 | |
| Nil | (ii) Outside India. ... | Nil | |
| 14,510—9-10 | *Particulars* | | |
| 14,510—9-10 | (i) Secured against Govt. securities, Shown as per contra. ... | 49,655-82 | |
| Nil | (ii) Un-Secured. ... | Nil | |
| | **5. Bills for Collection, being Bills Receivable as per contra** | | 19,093-54 |
| 21,367—6—0 | (i) Payable in India ... | 19,093-54 | |
| Nil | (ii) Payable outside India ... | Nil | |
| 21,367—6—0 | **6. Other Liabilities :** | | 25,628-00 |
| 420-10—0 | (i) For Expenses. ... | 1,890-00 | |
| 14,185-14—4 | (ii) Provident Fund, Invested as per Contra. ... | 16,709-81 | |
| 3,021—0—8 | (iii) Un-paid Dividends. | 2,977-38 | |
| 16,879—7—8 | (iv) Branch Adjustments. ... | 4,050-81 | |
| 34,507—0—8 | | | |
| Nil | **7. Acceptances, Endorsements and Other Obligations as per contra** ... | | Nil |
| | Carried over ... | | 17,72,475-75 |

# LIMITED, BHOR
## at 31st December, 1957

| 31-12-1956 | PROPERTY & ASSETS | Rs. n P. | Rs. n P. |
|---|---|---|---|
| Rs. As. Ps. | | | |
| 1,33,773-9-5 | 1. Cash | | 1,25,144-13 |
| | In hand and with the Reserve Bank and State Bank, (including foreign currency notes) ... | | |
| | 2. Balances with other Banks (In Current Account) | | 4,449-31 |
| 38,041-15-3 | (i) In India ... | 4,449-31 | |
| Nil | (ii) Outside India ... | Nil | |
| 38,041-15-3 | | | |
| Nil | 3. Money at Call and Short Notice ... | | Nil |
| | 4. Investments at cost. (Face Value Rs. 8,70,100/-). (Market ,, Rs. 8,16,347=95). | | 873,455-37 |
| 8,71,510-6-0 | (i) Securities of the Central and State Govt. and other trustee securities including Treasury Bills of the Central and State Govts. ) (Of these Securities of Rs. 14372 = 87 are earmarked for Provident Fund as per Contra. Securities of the Face Value of Rs. 4,49,000/- are pledged with Banking Companies for over-draft arrangement) | 8,72,810-37 | |
| 645-0-0 | (ii) Shares: Ordinary Shares Fully paid up of the Face Value of Rs. 600/- Market Value R. 606/- ... | 645-00 | |
| Nil | (iii) Debentures or Bonds ... | Nil | |
| Nil | (iv) Other Investments ... | Nil | |
| Nil | (v) Gold ... | Nil | |
| 8,72,155-6-0 | | | |
| | 5. Advances: ... (Other than Bad and Doubtful Debts for which provision has been made to the satisfaction of the Auditors) ... | | 6,94,259-11 |
| | (i) *Loans, Cash Credits, Overdrafts, etc.* ... | | |
| 6,26807-4-2 | In India | 6,92,259-11 | |
| Nil | Outside India | Nil | |
| | (ii) *Bills, Discounted and Purchased* (excluding treasury bills of the Central and State Govts.) ... | | |
| 22,000-0-0 | (a) Payable in India | 2,000-00 | |
| Nil | (b) Payable outside India | Nil | |
| 6,48,807-4-2 | | | |
| | **Particulars of Advances:—** | | |
| 3,91,606-3-6 | (1) Debts considered good in respect of which the Banking Co. is fully secured ... | 4,67,145-25 | |
| 1,93,261-3-8 | (2) Debts considered good for which the Banking Co. holds no other security than the debtors' personal security ... | 1,73,919-69 | |
| Nil | (3) Debts considered good, and secured by the personal liabilities of one or more parties in addition to the personal security of the debtors ... | Nil | |
| 63,939-13-0 | (4) Debts considered doubtful or bad, not provided for. (Exclusive of Rs. 30,130=37, included in item No. 2, fully provided for in the Reserve for Bad and Doubtful Debts as per Contra) ... | 53,194-17 | |
| 6,48,807-4-2 | | 6,94,259-11 | |
| Nil | (5) Debts due by the Directors or Officers of the Banking Co. or any of them either severally or jointly with any other persons ... | Nil | |
| 8,908-12-0 | (6) Debts due by Companies or firms in which the Directors of the Banking Co. are interested as Directors, Partners or Managing Agents, or in the case of private Co.'s as members ... | 8,908-75 | |
| Nil | (7) Maximum total amount of advances including temporary advances, made at any time during the year to Directors or Managers or officers of the Banking Co. or any of them either severally or jointly with any other person. ... | Nil | |
| | | C/F | 16,97,307-92 |

# BHOR STATE BANK

## Balance Sheet as

| 31-12-1956 | CAPITAL & LIABILITIES | Rs. nP. | Rs. nP. |
|---|---|---|---|
| Rs. As. Ps. | Brought Forward ... | | 17,72,475-75 |
| | **8. Profit and Loss Account :** | | 8,058-66 |
| 5,816-11—8 | Profit as per last Balance Sheet. ... | | |
| | Less : Appropriations :— ... | 4,453-73 | |
| Nil | Provision for Bad and doubtful debts. 3000/- | | |
| 1,192-14 | Reserve Fund. 900/- | | |
| 4500-0-0 | Provision for Income-tax. 400/- | | |
| 123-13—8 | | 4,300-00 | |
| 4,329-14—1 | *Add* : Net profit for the year (subject to taxation) | 153-73 | |
| 4,453-11—9 | brought from the Profit and Loss account. ... | 7,904-93 | |
| Nil | **9. Contingent Liabilities** | Nil | |
| | Total ... | | 17,80,534-41 |

## *PROFIT AND LOSS ACCOUNT FOR THE YEAR ended 31st December, 1957*

| 31-12-1956 | EXPENDITURE | Rs. nP. | Rs. nP. |
|---|---|---|---|
| Rs. As. Ps. | | | |
| 29,901—0—0 | 1. Interest paid on Deposits and Borrowings etc. ... | | 42,568-56 |
| | 2. Salaries & Allowances and Provident Fund :— ... | | 24,558-28 |
| | Managing Director, Manager or Chief Executive | | |
| 2923—5—4 | Officer : ... | 2,898-33 | |
| 19,679-12—4 | Others. ... | 21,659-95 | |
| 22,603—1—8 | | | |
| | 3. Directors and Local Committee Members' Fees and | | |
| 2,843—0—0 | Allowances. ... | | 1,827-00 |
| 3,329-10—0 | 4. Rent, Taxes, Insurance, Lighting etc. ... | | 3,713-82 |
| 1,987—3—0 | 5. Law Charges. ... | | 1,333-03 |
| 930—4—6 | 6. Postage, Telegrams and Stamps. ... | | 962-96 |
| 513-15—6 | 7. Auditors' fees and Expenses. ... | | 498-84 |
| | 8. Depreciation on and repairs to the Banking | | |
| 1,270—0—0 | Company's Property. ... | | 1,966-14 |
| 1,071-10—6 | 9. Stationery, Printing, Advertisement, etc. ... | | 1,598-45 |
| | 10. Loss from sale of or dealing with non-banking | | |
| 0—0—0 | assets. ... | | Nil |
| | 11. Other Expenditure. | | |
| 730-11—3 | Sundry Charges ... | 842-39 | |
| 761—2—3 | Travelling and Conveyance ... | 677-99 | |
| 247—9—0 | Telephone charges ... | 168-47 | 1,688-85 |
| 1,739—6—6 | | | |
| | 12. Balance of Profit (subject to taxation) transferred | | |
| 4,329-14—1 | to Balance Sheet ... | | 7,904-93 |
| 70,519—1—9 | Total Rs. ... | | 88,620-86 |

| 31-12-1956 | INCOME | Rs. nP. | Rs. nP. |
|---|---|---|---|
| Rs. As. Ps. | (Less provision made during the year for Bad and Doubtful Debts and other usual or necessary provisions.) | | |
| 65,129—6-3 | 1. Interest and Discount. ... | | 82,658-99 |
| 1,846—6-0 | 2. Commission, Exchange and Brokerage. ... | | 1,806-52 |
| 187—0-0 | 3. Rents. ... | | 448-00 |
| | 4. Net Profit on sale of Investments, gold and silver, land, premises and other assets (Not credited to Reserve or any particular fund | | |
| 0—0-0 | or account.) ... | | Nil |
| | 5. Net Profit on revaluation of Investments, gold and silver, land, premises and other assets (Not credited to Reserves or any particular | | |
| 0—0-0 | fund or account.) ... | | Nil |
| | 6. Income from Non-Banking assets and Profit | | |
| 0—0-0 | from sale of or dealing with such assets. ... | | Nil |
| | 7. Other receipts ... | | |
| 18-12-0 | Share Transfer fees and splitting fees. ... | 50-00 | |
| 854—0-0 | Safe Custody charges. ... | 843-50 | |
| 370-14-6 | Sundry receipts. ... | 510-87 | |
| 2,112-11-0 | Supervision charges. ... | 2,302-98 | 3,707-35 |
| 3,356—5-6 | 8. Loss (if any) — | | Nil |
| 70,519—1-9 | Total Rs. ... | | 88,620-86 |

# LIMITED, BHOR
## at 31st December 1957 ( Continued )

| 31-12-1956 | PROPERTY & ASSETS | Rs. n P. | Rs. n P. |
|---|---|---|---|
| Rs. As. Ps. | | | |
| | Brought Forward ... | | 16,97,307-92 |
| 9,916-4-0 | ( 8 ) Maximum total amount of advances including temporary advances granted during the year to the Companies or firms in which the Directors of the Banking Co. are interested as Directors, Partners, or Managing Agents, or in the case of private companies, as members. ... | 8,908-75 | |
| Nil | ( 9 ) Due from Banking Companies ... | Nil | |
| | **6. Bills Receivable, Being Bills For Collection** as per contra : | | 19,093-54 |
| 21,367-6-0 | ( i ) Payable in India ... | 19,093-54 | |
| Nil | ( ii ) Payable outside India ... | Nil | |
| Nil | **7. Constituents' Liabilities for Acceptances, Endorsements and Other Obligations** as per contra | | Nil |
| | **8. Premises Less Depreciation** ... | | 24,155-70 |
| 26,399-15-9 | As per last Balance Sheet. ( at cost ) | 26,869-66 | |
| 469-10-9 | Add. : Additions during the Year. | 41-20 | |
| 26,869-10-6 | | 26,910-86 | |
| 1,501-2-6 | Less : Depreciation written off. | 2,755-16 | |
| 25,368-8-0 | | | |
| | **9. Furniture and Fixtures Less Depreciation** ... | | 9,442-04 |
| 23,689-9-3 | as per last Balance Sheet ( at cost ) | 23,689-57 | |
| 0-0-0 | | | |
| 23,689-9-3 | Add. : Additions during the Year. | Nil | |
| | | 23,639-57 | |
| 13,535-6-0 | Less : Depreciation written off. | 14,247-53 | |
| 10,154-3-3 | | | |
| | **10. Other Assets Including Silver** ... | | 30,535-21 |
| 6,967-3-7 | ( i ) Interest accrued but not received. | 6,974-71 | |
| 350-0-0 | ( ii ) Stock of Printing and Stationery on hand (as valued and certified by the Manager.) | 500-00 | |
| 20-2-6 | (iii) Interest due but not Collected. | Nil | |
| 7,794-3-6 | (iv) Sundry Debtors. ( being considered Doubtful and not provided for ) | 7,756-17 | |
| Nil | ( v ) Stamp Accounts. | Nil | |
| 14,006-12-0 | (vi) Income Tax Paid at Source. | 15,304-33 | |
| 29,138-5-7 | | | |
| Nil | **11. Non-Banking Assets Acquired in Satisfaction of Claims** ... | | Nil |
| Nil | **12. Profit and Loss Account :** | | Nil |
| 17,78,806-9-8 | | Total Rs. | 17,80,534-41 |

**Y. S. Joshi,** *Manager* **M. V. Shingre.** *Chairman* **N. P. Thopte,** *Vice Chairman* | *Directors* { **Y. D. Khole, B. G. Dhanduke, G. B. Devi,**

Shri. C. R. Rathi has not signed as he was not present for the meeting.

## REPORT OF THE AUDITORS TO THE SHAREHOLDERS

We have audited the annexed Balance Sheet of the Bhor State Bank Limited, as at 31st December, 1957 and also the foregoing Profit and Loss Account of the Bank for the year ended on that date, in which are incorporated unaudited returns from all the Branches in India not visited by us for the purposes of this Report.

In accordance with the provisions of Section 29 of the Banking Companies Act, 1949, read with the provisos to sub-sections ( 1 ) and ( 2 ) of section 211 and sub-section (5) of section 211 and 227 of the Companies Act, 1956, the Balance Sheet and Profit and Loss Account are not required to be and are not drawn up in accordance with the Sixth Schedule to the Companies Act; 1956. They are, therefore drawn up in conformity with Forms A and B of the Third Schedule to the Banking Companies Act, 1949.

We report that :—

(a) We have obtained all the information and explanations which, to the best of our knowledge and belief, were necessary for the purpose of audit and have found them to be satisfactory ; (b) The transactions of the Bank which have come to our notice, have been within the powers of the Bank ; (c) In our opinion, proper books of accounts as required by law have been kept by the Bank so far as appears from our examination of those books and proper returns adequate for the purpose of our audit have been received from the Branches of the Bank ; (d) The Bank's Balance Sheet and Profit and Loss Account dealt with by this report are in agreement with the books of account and the returns ; (e) In our opinion, and to the best of our information and according to the explanations given to us, the said accounts give the information required by the Companies Act, 1956 in the manner so required for banking companies, and on such basis the said Balance Sheet gives a true and fair view of the state of affairs of the Bank as at 31st December, 1957 and the Profit and Loss Account gives a true and fair view of the profit for the year ended on that date.

Poona
23rd February 1958

**GADRE & BHIDE,**
Chartered Accountants.

## रशिआंतील व्यवसायांत स्त्रियांचें स्थान

सोव्हिएट रशिआची आर्थिक प्रगति ज्या गतीनें होत आहे त्या प्रमाणांत समाजांतील निरनिराळ्या व्यवसायांत स्त्रियांचें प्रमाण वाढूं लागलें आहे. रशिआचे पंतप्रधान मि. क्रुश्चेव्ह ह्यांनीं एका प्रसंगीं बोलतांना असें सांगितलें कीं, समाजांतील गुणी व्यक्तींना उत्तेजन देण्याचें सरकारचें धोरण असल्यामुळें रशिआचीं शास्त्रीय प्रगति झपाट्यानें झाली आहे. हेंच धोरण स्त्रियांची व्यावसायिक प्रगति घडवून आणण्यास कारणीभूत झालें असल्याचें दिसतें. आजच्या रशिआंत इतर अनेक व्यवसायांप्रमाणें डॉक्टरीच्या व्यवसायांतहि स्त्रियांचा भरणा मोठ्या प्रमाणावर दिसून येतो. हा धंदा जवळ जवळ संपूर्णपणें त्यांनींच आपल्या ताब्यांत घेतला आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. इतकेंच काय पण पुष्कळ रशिअन पुरुषहि हा धंदा स्त्रियांचाच असल्याचें समजूं लागले आहेत. एखाद्या रशिअन पुरुषाला पुरुष डॉक्टरकडूनच उपचार करून घ्यावयाचा असेल तर त्याला जरा वाटच पहावी लागते. वैद्यकीय क्षेत्राप्रमाणें, कायदा, अर्थशास्त्र, एंजिनिअरिंग, शास्त्रीय संशोधन, ह्या क्षेत्रांतहि रशिअन स्त्रिया मोठ्या संख्येनें शिरकाव करून घेऊं लागल्या आहेत. थोडक्यांत म्हणजे, अत्यंत श्रमाचीं अशीं अवघड कामें सोडून इतर सर्व प्रकारचीं शारीरिक व बौद्धिक कामें रशिआंतील स्त्रिया करूं लागल्या आहेत.

रशिअन आकडेशास्त्रीय पुस्तकांत दिलेल्या माहितीप्रमाणें १९४१ सालीं १,४०,००० रशिअन डॉक्टर्सपैकीं ८५,००० डॉक्टर्स स्त्रिया होत्या. टक्केवारींत हें प्रमाण ६१ टक्के पडलें. १९५६ अखेर रशिआंतील स्त्री-डॉक्टरांची संख्या तिप्पट झालेली आढळून येते. ह्या सुमारास ३,२९,००० डॉक्टर्सपैकीं २,४७,००० म्हणजे ७५ टक्के डॉक्टर्स स्त्रिया होत्या. रशिआच्या २०·३ कोटी लोकसंख्येला ह्या डॉक्टरमंडळींनीं उपचार केले. ह्या बाबतींत अमेरिका सुद्धां रशिआच्या मागें दिसून येतें. अमेरिकेंतील २,३०,००० डॉक्टर्सपैकीं अवघे ७,००० डॉक्टर्स स्त्रिया आहेत. म्हणजे एकूण डॉक्टरांच्या संख्येशीं स्त्री-डॉक्टरांची टक्केवारी फक्त ३ टक्के पडते. अमेरिकेच्या १७ कोटी लोकसंख्येला त्यांनीं वैद्यकीय मदत दिली. सोव्हिएट रशिआंतील वैद्यकीय शिक्षणाच्या शाळांतून स्त्रिया गर्दी करीत आहेत. १९५५-५६ सालीं वैद्यकीय शिक्षणसंस्थांतून ज्या विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यांत आला, त्यांपैकी ७० टक्के विद्यार्थी तरुण मुली होत्या. तथापि, डॉक्टरीच्या व्यवसायांत स्त्रिया असणें ही गोष्ट रशिआंत कांहीं नवी नाहीं. १९१७ सालची बोल्शेव्हिक क्रांति होण्यापूर्वींहि रशिआंत पुष्कळ स्त्रिया डॉक्टरीचा व्यवसाय करीत असत.

इतर कांहीं व्यवसायांतील टक्केवारी अशी आहे. अर्थशास्त्रज्ञांत ५४ टक्के स्त्रिया आहेत. ह्या सदरांत आंकडे शास्त्रज्ञ, व्यापारी व व्यवस्थापक ह्यांचाहि समावेश होतो. वकिलांपैकीं ३२ टक्के वकील स्त्रिया आहेत. शेतीतज्ज्ञ, गुरांचे डॉक्टर्स व जंगलतज्ज्ञ ह्यांच्या एकूण संख्येपैकीं ३९ टक्के स्त्रिया आहेत. शास्त्रीय संशोधकांत ३६ टक्के व एंजिनिअर्समध्यें २८ टक्के स्त्रिया आहेत.

'एअर सीलोन' च्या मालकीचें विमान—'एअर सीलोन' ही विमानवहातूक कंपनी आपल्या दूरच्या पल्ल्याच्या प्रवासासाठी लवकरच स्वतःचें विमान खरेदी करणार आहे. आतांपर्यंत ही कंपनी अशा प्रवासासाठी भाड्यानें विमान घेत असे.


अन्नाचें रहस्य




बेडेकर मसाले, लोणचीं, पापड ह्या वस्तूंनीं आपल्या जेवणांत गोडी वाढते व समाधान वाटतें.

★ व्ही. पी. बेडेकर आणि सन्स लि. ★

दुकानें—मुगभाट, ठाकुरद्वार, दादर, कोट, परळ

— द. ना. हेजीब, ३० शुक्रवार पेठ, पुणें —

दि सांगली बँक लि.

सांगली.

स्थापना १९१६ : शेडयूल्ड बँक

वसूल भांडवल रु. ४,५०,००० 
रिझर्व्हस् व इतर फंडस् रु. ७,९०,०००
खेळतें भांडवल अदमासें रु. २,००,००,०००

: शाखा :

रबकवी, तेरदळ, कवठें महांकाळ, शिरहट्टी, विलिंग्डन कॉलेज, मंगळवेढा, शहापूर, उगार खुर्द, इचलकरंजी, कराड, कोल्हापूर, मुंबई-फोर्ट व मार्केट यार्ड (सांगली)

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

मॅनेजर.

माधवाश्रम लि. भोजनाची व राहण्याची उत्कृष्ट सोय. विवाहकार्यांची संपूर्ण व्यवस्था. गिरगांव, मुंबई ४

कण आणि क्षण
( सुखी जीवनाच्या पाऊलवाटा )
लेखक: —श्री. वा. काळे, संपादक, "अर्थ"
मराठी दुसरी आवृत्ति ] [ किं. १ रु. ८ आ.


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२१ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.